# उल्लास

## प्रवेशिका (भाग - 3)




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

राज्य साक्षरता केंद्र


## उल्लास प्रवेशिका (भाग - 3)


- **प्रेरणा :**
  **मा. ना. दिपक केसरकर**
  मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. रनजीत सिंह देओल**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. सूरज मांढरे**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र, पुणे.
- **मार्गदर्शन :**
  **श्री. अमोल येडगे** (भा.प्र.से.),
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. महेश पालकर**
  संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्रीम. उषा शर्मा,** प्रोफेसर एवं प्रभारी,
  राष्ट्रीय साक्षरता केंद्र– कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **श्री. रमाकांत काठमोरे,** सहसंचालक,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती व संपादन :**
  **डॉ. नेहा बेलसरे,** उपसंचालक, राज्य साक्षरता केंद्र,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. रत्नमाला खडके,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला (महाराष्ट्र).
  **डॉ. मंजुषा क्षीरसागर,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे (महाराष्ट्र).
- **निर्मिती, संपादन व सल्लागार – हिंदी उल्लास (CNCL) :**
  **श्रीम. बाणी बोरा,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **याचना गुप्ता,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **शिवा श्रीवास्तव,** वरिष्ठ सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **रोहित नैनवाल,** सल्लागार , राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
  **सोनाली,** कनिष्ठ प्रकल्प सहायक, राष्ट्रीय साक्षरता केंद्र–कक्ष, एनसीईआरटी, नवी दिल्ली.
- **समन्वयक :**
  **डॉ. गितांजली बोरुडे,** विभाग प्रमुख,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. सचिन चव्हाण,** विभाग प्रमुख,
  सामाजिकशास्त्र विभाग , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. पंढरीनाथ जाधव,** अधिव्याख्याता,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्री. अण्णासाहेब कुटे,** विषय सहायक,
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **तांत्रिक साहाय्य व डिझायनिंग :**
  **श्री. स्वप्निल वैरागडे**, शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा महाबळा, ता. सेलू, जि. वर्धा.
- **मुखपृष्ठ रेखाटन :**
  **श्री. सुभाष जीवा राठोड**, कलाशिक्षक, दीपचंद चौधरी विद्यालय, सेलू, जि. वर्धा.
- **प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर, 2023
- **अर्थसाहाय्य :** राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **मुद्रक :** रुना ग्राफिक्स, पुणे


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# उल्लास

## प्रवेशिका (भाग - 3)



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
राज्य साक्षरता केंद्र

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 8. | आपत्तींचे प्रकार व स्वरूप | 201 |
| 9. | काळानुरूप बदलत्या गोष्टी | 217 |
| 10. | प्रवास | 239 |

आपत्तीचा अर्थ संकट असा होतो. अशी संकटे अचानकपणे उद्‌भवतात. सोबत दिलेल्या चित्रात कोणत्या प्रकारच्या आपत्ती दाखविलेल्या आहेत? तुम्ही कधी अशा आपत्तींचा सामना केला आहे काय?





# 8. आपत्तींचे प्रकार व स्वरूप

**आपण शिकूया!**

- धारकतेचे मापन करणे. (मिलीलीटर, लीटर)
- गुणाकार आणि भागाकाराशी जुळलेल्या दैनंदिन जीवनातील समस्या सोडवणे.

■ **पाहा आणि वाचा.**



आग



पूर




भूकंप



रेल्वे दुर्घटना




**ॲम्ब्युलन्स**
**(रुग्णवाहिका)**



**आगीचा बंब**



**चेंगराचेंगरी**



**बचाव शिबिर**

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- चित्राच्या खाली दिलेल्या शब्दांवर बोट ठेवून वाचायला सांगा.
- सहभागींकडून चित्राच्या खाली दिलेले शब्द वाचून घ्या.
- वेगवेगळी संकटे/आपत्तींबाबत सहभागींसोबत चर्चा करून, त्यांचे अनुभव समजून घ्या.

## ▪ मिळून वाचा.

### माळीण गावातील दरड दुर्घटना

माझे नाव यशोदा आहे. मी पुणे जिल्ह्यातील माळीण गावात राहत होते. माळीण हे गाव डोंगराच्या पायथ्याशी होते. ही गोष्ट 8 वर्षांपूर्वीची आहे. 30 जुलै, 2014 या दिवशी प्रचंड पाऊस झाला, सकाळी साडेसातला दरड कोसळली. गावातील डोंगरात स्फोटासारखा आवाज झाला आणि मातीचा ढिगारा, चिखल, उन्मळलेली झाडे अचानक खाली येऊ लागली. लोकांना काही समजण्याच्या आत गाव चिखलाखाली गाडले गेले. गावातील 74 पैकी 44 घरे दबली गेली. जवळजवळ संपूर्ण गाव क्षणार्धात गायब झाले.





सगळ्यांची घरे, कपडे, भांडी, खाण्याच्या सामानासह ढिगाऱ्याखाली दबली. 300 पेक्षा जास्त लोकांना शारीरिक दुखापतींपेक्षा जबर मानसिक धक्का बसला होता. राष्ट्रीय बचाव दल (एन.डी.आर.एफ.) ने धो–धो पावसात अखंड बचाव कार्य राबविले. मोबाईल टॉवर अभावी बचावकार्यात अडथळा निर्माण होत होता. मृतदेह सडल्यामुळे सगळीकडे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले होते. शोध कार्यासाठी 'साथी हाथ बढ़ाना' अभियान राबवले गेले. 70 - 80 उंबरठ्याचे दुर्गम गाव क्षणार्धात नाहीसे झाले.

या घटनेला खाणी, पवनचक्क्या, पाऊस, डोंगरउतार व मानवी हस्तक्षेप जबाबदार आहे.

राज्यशासनाने मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख मदतीची घोषणा केली. खूप लोकांनी आम्हांला मदत केली. काहींनी राहण्यासाठी तंबू बांधले, तर काही सेवाभावी संस्थांनी कपडे, भांडी, खाण्या–पिण्याचे सामान दिले.

आमच्या गावाचे पुनर्वसन करण्यात आले. परत अशी घटना होऊ नये म्हणून सर्व स्तरांतून जनजागृती करण्यात आली.

स्रोत – इयत्ता पाचवी मराठी
(बालभारती)

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- हा पाठ शिकविताना सहभागींना माळीण दुर्घटनेबाबत सांगितले जाणे योग्य होईल.
- दरड कोसळण्याच्या परिस्थितीबाबत सहभागींशी चर्चा करा.
- सहभागींना विचारावे, की त्यांनी दरड कोसळण्याच्या आपत्तीचा कधी सामना केला आहे का? त्यावेळी त्यांना कोणकोणत्या समस्या आल्या? जनसामान्यांचे किती नुकसान झाले? इत्यादी.

## विचार करा आणि सांगा.

प्रश्न 1. आपत्तीच्या वेळी जेव्हा लोकांना घरे राहिली नाहीत, त्यावेळी लोकांना कोणत्या प्रकारच्या मदतीची गरज होती?

प्रश्न 2. विचार करा, जर तुमच्याकडे दरड कोसळण्याचा प्रसंग आला, तर तुमच्या घराला कोणता धोका होऊ शकतो? अशी जर शक्यता असेल तर तुम्ही कोठे राहाल?

प्रश्न 3. दरड कोसळण्याच्या आपत्तीच्या वेळी आपल्या पाळीव जनावरांची सुरक्षितता व देखभालीसाठी तुम्ही काय कराल?

प्रश्न 4. तुम्ही कधी आपल्या जीवनात दुष्काळ, भूकंप, पूर, दरड कोसळणे यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचा सामना केला आहे का? जर केला असेल तर तुमचे अनुभव सांगा?

प्रश्न 5. तुम्हांला असे वाटते का, की यांपैकी काही आपत्तींसाठी मनुष्य सरसकट जबाबदार आहे? अशा कोणत्याही आपत्तीबाबत मित्रांशी संवाद करा. संवादादरम्यान मुख्य मुद्दे लिहून काढा.

दरड कोसळली तर कोणकोणती दक्षता घ्यायला हवी यावर चर्चा करा.

जसे –

- सतत दोन तास मुसळधार पाऊस सुरू राहिला, तर सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित व्हावे.
- तज्ज्ञांच्या पाहणीनंतर पुन्हा घरी जावे.
- हवामान खाते किंवा प्रशासनाने दिलेली धोक्याची घंटा लक्षात घ्यावी.

1. दरड कोसळू नये म्हणून काय काय करता येईल ?
   - पाण्याचे प्रवाह मोकळे करावेत.
   - आजूबाजूच्या मोकळ्या परिसरात झाडे लावावीत.

2. नैसर्गिक आपत्ती येऊ नये यासाठी काय काय कराल ?
   - पूरप्रवण क्षेत्र केवळ शेती, झाडे-झुडपे यांसाठी राखीव असावे.
   - नागरी शेती आणि शहरी जंगले अशा नव्या कल्पना शहर नियोजनात आणायला हव्यात.


3. तुमच्या गावात दरड कोसळली तर काय कराल ?
   - सर्व गावकरी एकत्र येऊन बचाव कार्य हाती घेऊ.
   - पोलीस यंत्रणेला पाचारण करून वाहने दोन्ही बाजूंनी सोडू.
   - महामार्गावरील माती हटवू.

4. तुम्ही दरड कोसळण्याप्रसंगी कोणती काळजी घ्याल ?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________



## ▪ आपत्ती संदर्भात सूचना

कोणत्याही आपत्तीच्या वेळी तुम्हांला मदतीची गरज पडू शकते. आपल्या परिसरात असलेले पोलीस स्टेशन, अग्निशामक केंद्र, जवळच्या दवाखान्याचा पत्ता आणि फोन नंबर माहीत करून घ्या. ही माहिती लिहा आणि लक्षातही ठेवा.

| नाव | पत्ता | फोन नंबर |
|---|---|---|
| अग्निशामक केंद्र | | |
| जवळचा दवाखाना | | |
| ॲम्ब्युलन्स | | |
| पोलीस स्टेशन | | |

## माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- ‘आपत्तींचे प्रकार व स्वरूप’ या विषयाचा समारोप करत करत संवाद करा. सहभागींना विचारून या विषयाशी संबंधित 3 ते 4 शब्द लिहा. हे शब्द त्यांच्या बोलीभाषेतीलही असू शकतात. जसे – भूकंप शब्दाला धरणीकंप इत्यादी.
- सहभागींनी ज्या आपत्ती सहन केल्या, त्यावर चर्चा करा आणि अनुभवांवर आधारित पोस्टर/चित्र तयार करायला प्रोत्साहित करा.


## बचाव कार्य


- जर एका तंबूत 6 लोक राहू शकतात, तर 30 लोकांसाठी एकूण किती तंबू उभारावे लागतील?
- दुर्घटनेमध्ये 50 लोक जखमी झाले आहेत आणि एका ॲम्ब्युलन्समध्ये 5 लोक येऊ शकतात, तर जखमी लोकांसाठी एकूण किती ॲम्ब्युलन्सची गरज पडेल?


## धारकता मापन

लोकांना जेवण, पाण्याची बाटली तथा दुधाचे पाकीट वाटले गेले. पाण्याच्या बाटल्या विभिन्न आकारामध्ये होत्या. काही छोट्या, काही मोठ्या तर काही त्यापेक्षा मोठ्या, सर्व बाटल्यांवर त्यात किती पाणी आहे याचे माप लिहिलेले होते.

- 1 लीटर पाण्याची बाटली भरण्यासाठी 500 मिलीच्या किती बाटल्यांची आवश्यकता असेल?
- 2 लीटरची बाटली भरण्यासाठी 250 मिली किती बाटल्यांची आवश्यकता असेल?


1 लीटर


750 मिली (तीन पाव)


500 मिली (अर्धा लीटर)


250 मिली (पाव)

(1 लीटर = 1000 मिली )


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना वेगवेगळ्या मापाचे भांडे/बाटली मापनाच्या संबंधाने शोधण्याच्या हेतूने प्रेरित करा.
- चर्चा करा, की त्यांनी छोटी धारकता आणि मोठ्या धारकतेचे भांडे कोठे पहिले आहे?
- मिलीलीटर (मिली) आणि लीटर (ली.) घनफळ धारकता हे मापनाचे एकक आहेत.
- कोणत्याही भांड्याची धारकता, त्या भांड्यात किती तरल पदार्थ मावतो ते सांगते.
- छोट्या भांड्याची धारकता मिलीलीटरमध्ये मोजली जाते आणि मोठ्या भांड्याची धारकता लीटरने मोजली जाते.
- एका लीटरमध्ये 1000 मिलीलीटर असतात.

- मेडिकल कॅम्पमध्ये आजारी व्यक्तीला डॉक्टरांनी 100 मिली औषधाची बाटली दिली आणि प्रत्येक दिवशी 20 मिली औषध घेण्याचा सल्ला दिला, तर आजारी व्यक्तीला किती दिवसांचे औषध दिले आहे?




- पुराच्या दरम्यान एका गावात रोगाची साथ पसरू नये म्हणून लसीकरण करणारी टीम पाठवली गेली. ही टीम औषधाच्या 50 मिलीच्या 20 बाटल्या घेऊन गेली. लसीकरणात एका व्यक्तीला 5 मिली औषध लागते. आणलेल्या औषधात किती लोकांचे लसीकरण होईल?





## टिपण

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- शिकलेल्या शब्दांचा लेखन सराव घ्या.
- संख्या व संख्यावरील क्रिया यांचा सराव घ्या.
- मापनाचे विविध प्रकार याबाबत चर्चा घडवून आणा.

1) तुम्ही आपत्ती काळाबाबत काही सांगा– सुखाचा काळ किंवा दुःखाचा काळ.
2) कोरोना काळात तुम्ही कोणाची मदत केली आहे का ?
3) कोरोना काळात आलेल्या आपत्तीतून तुम्ही काय शिकलात ?
4) मास्क लावणे का आवश्यक आहे ? चर्चा करा.
5) सॅनिटायझर वापराचे काय महत्त्व आहे ? चर्चा करा.





# 9. कालानुरूप बदलत्या गोष्टी

**आपण शिकूया!**

- दोन अंकी संख्येचा गुणाकार
- वेळ मोजणे (तास, मिनिट, सेकंद)
- वेळेचे महत्त्व
  घड्याळाचा उपयोग करणे.
- (12 आणि 24 तास दाखविणारी घड्याळे)

## खाली दिलेले शब्द वाचा.

| | | | |
|---|---|---|---|
| वेळ | दिवस | काळ | जमाना |
| युग | घड्याळ | सप्ताह | वर्ष |
| महिना | पंधरवडा | रात्र | कॅलेंडर |
| सकाळ | संध्याकाळ | दुपार | प्रहर |
| घटिका | तास | सेकंद | मिनिट |

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- वेळेच्या संबंधाने येणाऱ्या शब्दांबाबत सहभागींसोबत संवाद साधा.
- याच्याशी जुळणारे शब्द किंवा म्हणी तयार करायला सांगा.
  उदा., काळ आला होता; पण वेळ आली नव्हती.

## ▪ मिळून वाचा आणि चर्चा करा.

### हाजी आणि नाजी

ही गोष्ट हाजी आणि नाजी या दोन बेरोजगार मित्रांची आहे. दोघे सकाळपासून संध्याकाळपर्यंत नोकरीच्या शोधात फिरत राहायचे. परिस्थिती इतकी बिकट होती, की दोन वेळचे जेवण मिळवण्यासाठी ते काहीही करायला तयार होते. त्या काळात शहरात एक सर्कस आलेली होती. सर्कसवाल्यांनी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. त्यांना काही दिवसांसाठी काही व्यक्तींची गरज आहे, इच्छुक व्यक्तींनी सकाळी दहा वाजता हॉटेल साईमध्ये संपर्क साधावा. जवळपास साडेदहा वाजता नाजी पोहोचला. सर्कसवाले म्हणाले, ''बघ बाबा, बाब अशी आहे, की आमचे माकड आजारी पडले आहे.



त्याच्या जागी तुला माकडाचा पेहराव घालून, थोड्या वेळासाठी माकड व्हावे लागेल. एक दिवसाचे 60 रुपये मिळतील.''

नाजीने विचारले, ''माकड होऊन मला खालीवर उड्या माराव्या लागतील का?''

सर्कसवाले म्हणाले, ''हो, पण वाघाच्या पिंजऱ्यात घुसताना घाबरू नको, वाघ तुला काही करणार नाही.''

नाजीला भीती तर खूप वाटली, पण कामाची नितांत गरज होती, म्हणून तो तयार झाला.

पुढच्या दिवशी माकडाचा पेहराव घालून नाजी वर–खाली उड्या मारीत पोहोचला. दर्शक त्याला पाहून खूप खूश झाले आणि टाळ्या वाजवू लागले, पण जेव्हा वाघाच्या पिंजऱ्यात घुसण्याची वेळ आली तेव्हा नाजी प्रचंड घाबरला. त्याच्याकडून एक पाऊलही पुढे पडेना. मोठ्या मुश्किलीने तीन व्यक्तींनी मिळून त्याला वाघाच्या पिंजऱ्यात ढकलले.

वाघाला समोर पाहून नाजीची वाचाच गेली. तो कोपऱ्यात जाऊन बसला आणि थरथर कापू लागला. भीतीपोटी सू झाली. हळूहळू चालत वाघाच्या समोर आला. त्याने आपले तोंड नाजीकडे वळवले आणि म्हणाला, ''घाबरू नको मी हाजी आहे. तू साडेदहा वाजता पोहोचलास, तर मी पावणेदहा वाजताच पोहोचलो, त्यावेळी वाघाची जागा रिक्त होती.''

– स्वयं प्रकाश

( स्रोत – साइकिल, बच्चो का दुपहिया)

## मिळून वाचा आणि संवाद करा.

प्रश्न 1. आता सर्कस पहिल्यासारखी चालत नाही याची काय कारणे असतील?

प्रश्न 2. असे आणखी कोणकोणते प्रदर्शनीय खेळ आहेत, जे काही काळापूर्वी भरपूर चालायचे, परंतु आता चालत नाहीत, असे का?

प्रश्न 3. बेरोजगारी असल्यामुळे हाजी आणि नाजी यांना सर्कसमध्ये काम करावे लागले. आजच्या काळात बेरोजगारांची संख्या वाढत आहे की घटत आहे?

प्रश्न 4. आजच्या काळातसुद्धा काही लोकांना स्त्रियांनी घराबाहेर जाऊन नोकरी करणे पसंत पडत नाही याबाबत आपले काय मत आहे?

प्रश्न 5. बऱ्याचदा लोकांना अशा कामात खपावे लागते, जे त्यांना करायचे नसते, असे का होत असेल? या गोष्टींचे काही समाधान असू शकते का?

## माझ्या आवडीचे काम

## माझ्या आवडीचे काम

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- विविध शब्दांचे लेखन करून घ्या.
- अध्ययनार्थींना माहिती असलेल्या विविध गोष्टी सांगण्यास प्रवृत्त करा.
- गणन सराव घ्या.





**योग्य वेळी**

योग्य वेळी नियमानुसार रोज सूर्य उगवतो,
त्याच नियमाने चंद्र ही, वाढत–घटत जातो.
त्याच नियमाने चांदण्या अंधुक होतात,
पुन्हा नव्या तेजाने लुकलुकतात.
त्याच नियमाने नद्या–नाले,
सागराला जाऊन मिळतात.





त्याच नियमाने तुम्ही सुद्‌धा,

आपली कामे सांभाळा.

लवकर उठा, स्नान करा,

अन् वेळेवर जेवून घ्या.

योग्य वेळी अभ्यास करा,

योग्य वेळी खेळा,

तरच सगळे जिंकू शकता,

हवे ते मिळवू शकता.

*मूळ स्रोत : निरंकारदेव सेवक*

प्रश्न 1. वेळ या शब्दाचा उपयोग करून एक वाक्य तयार केलेले आहे. खाली दिलेल्या शब्दांचा उपयोग करून वाक्य तयार करून लिहा.

| | |
|---|---|
| वेळ | जो वेळेची किंमत करीत नाही, वेळ त्याची किंमत करीत नाही. |
| शतक | |
| काळ | |
| युग | |
| दिवस | |

प्रश्न 2. या गीताद्वारे वेळेत काम करण्यावर भर दिलेला आहे.

त्याच नियमाने तुम्ही सुद्धा,

आपली कामे सांभाळा.

लवकर उठा, स्नान करा,

अन् वेळेवर जेवून घ्या.

तुम्ही कोणती कामे वेळेवर करू शकता आणि कोणती नाही? सकारण सांगा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

______________________________

प्रश्न 3. कोणतेही एक काम, जे आपण दिलेल्या वेळेत कराल किंवा करावे वाटेल. ते खालील चौकटीत लिहा.

| | |
|---|---|
| आज | |
| उद्या | |
| या सप्ताहात | |
| या महिन्यात | |
| या वर्षात | |

## माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- आतापर्यंत शिकलेल्या अक्षरगटापासून तयार होणारे शब्द लिहिण्यास सांगा.
- वाचलेले शब्द पाहून लिहिण्यास सांगा.

■ **आपल्या संवादात (गप्पांमध्ये) वेळ केव्हा, कुठे, कसा येतो, वाचा –**

**वेळेचा फेरा**

अंत:काळापेक्षा मध्यान्ह काळ कठीण

काळ खराब चालला आहे


रात्र थोडी सोंगे फार

गेलेली वेळ परत येत नाही

काळाबरोबर चालावे


याप्रकारची अजून काही वाक्ये सांगा, ज्यात वेळेचा उल्लेख येतो.

■ **चला मोजूया, आपल्या हातांना किती बोटे आहेत?**



दोन हातांना एकूण बोटे $2 \times 5 = 10$

■ **12 हातांची बोटे किती आहेत?**




12 वेळा 5 म्हणजे

12 × 5 किंवा

$$\begin{array}{r} 12 \\ \times\ \ 5 \\ \hline \square \end{array}$$


■ **चला घड्याळात वेळ पाहायला शिकूया!**

साधारणपणे घड्याळाच्या तबकडीवर 12 अंक असतात. प्रत्येक दोन अंकांच्या मधे 4 छोट्या-छोट्या रेषा असतात.





■ **पूर्ण तबकडीवर किती रेषा आहेत? मोजून लिहा ............. रेषा**

■ **घड्याळाच्या तबकडीवर दोन किंवा तीन प्रकारचे काटे फिरत असतात.**




**तीन काट्यांचे घड्याळ**




**दोन काट्यांचे घड्याळ**

- **सगळ्यात जाड आणि सर्वांत छोटा तास काटा आहे, तास काटा तास दाखवितो.**

  ‘तास काटा’ एका अंकावरून दुसऱ्या अंकावर एका तासात पोहोचतो. बारा तासांत पूर्ण तबकडीवर एक चक्कर पूर्ण करतो. 24 तासांत म्हणजे एका दिवसात तो पूर्ण तबकडीवर किती वेळा फिरेल?

- **तास काट्यापेक्षा बारीक आणि लांब काटा मिनिटाचा आहे. तो मिनिट दाखवितो. मिनिट काटा एका अंकावरून दुसऱ्या अंकावर पाच मिनिटांत पोहोचतो. तो 60 मिनिटांत तबकडीवर एक चक्कर पूर्ण करतो.**

- **सगळ्यात बारीक आणि लांब काटा सेकंदाचा आहे. हा सगळ्यात जोरात चालतो. तो सेकंद दाखवितो.**




घड्याळात 2 वाजले आहेत.




घड्याळात 5 वाजले आहेत.

60 मिनिटे पूर्ण होण्यासाठी एक तासाचा वेळ लागतो.

3 तास पूर्ण होण्यासाठी किती मिनिटे लागतील?

$3 \times 60$ किंवा

$$\begin{array}{r} 60 \\ \times\ 3 \\ \hline \square \end{array}$$

# घड्याळात किती वाजले...

जेव्हा मिनिट काटा 12 वर असेल तेव्हा,
तास काटा ज्या अंकावर असेल
तितके वाजले असतील, जसे;
तास काटा 3 वर आणि मिनिट काटा
12 वर असेल तेव्हा तीन वाजतील.







बारा वाजले




______ वाजले




______ वाजले




______ वाजले



______ वाजले



______ वाजले



______ वाजले



______ वाजले



______ वाजले


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना प्रेरित करा, की ते घड्याळात पाहून वेळ सांगायला शिकतील.
- वेळेचे मापन आणि तास, मिनिट व सेकंद यांच्यातील संबंध सहभागींना समजावून सांगा.

# डिजिटल घड्याळे

- डिजिटल घड्याळात वेळ सरळ लिहिलेली असते. रेल्वेस्टेशन, मोबाईल फोन इत्यादीमध्ये डिजिटल घड्याळे असतात.
- सांगा, या घड्याळात किती वाजले आहेत?




06:40

______ वाजले

07:45

______ वाजले

12:45

______ वाजले

06:20

______ वाजले

■ **चला आता करून पाहूया! (पहिल्यांदा अंदाज लावा आणि परत घड्याळाचा उपयोग करून लक्षात घ्या.**

- जेवण करण्यासाठी आपल्याला किती वेळ लागतो?__________मिनिटे
- अंघोळीसाठी आपल्याला किती वेळ लागतो?_________ मिनिटे
- रात्री मी ___________वाजता झोपते/झोपतो आणि सकाळी

  __________वाजता उठते/उठतो. मी__________ तास झोपते/झोपतो.
- गावातील शाळा__________वाजता सुरू होते आणि

  _________वाजता बंद होते. शाळा________ तास असते.

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना काटे असणारे घड्याळ आणि डिजिटल घड्याळ यात वेळ पाहण्यासाठी आणि सांगण्यासाठी प्रोत्साहित करणे.


# शेतकऱ्याची सकाळ

सकाळी 6 वाजता  शेतकरी गवत कापायला सुरुवात करतो. त्याचे छोटे-छोटे गठ्ठे बनवतो. जेव्हा 5 छोटे गठ्ठे तयार होतात तेव्हा ते पाच एकत्र बांधून मोठा गठ्ठा बनवितो. 7 वाजेपर्यंत  गवत कापून पंधरा मिनिटांनंतर घरी पोहोचतो.

सकाळी 6 वाजेपासून 7 वाजेपर्यंत त्याने गवताचे 4 मोठे गठ्ठे तयार करून ठेवले होते.

- त्याने गवत कापून किती छोटे गठ्ठे बनवले?

  याला ____ × ____ असे पण लिहू शकता.

  तो घरी परत किती वाजता पोहोचला होता? सकाळी ____ वाजता 

  या वेळेला घड्याळात दाखवू या.

  शेतकऱ्याने गवत कापणे किती वाजता सुरू केले होते? सकाळी ____ वाजता.

  शेतकऱ्याने गवत किती वाजेपर्यंत कापले? सकाळी ____ वाजेपर्यंत.

  गवत कापायला शेतकऱ्याला किती वेळ लागला? = ____ तास ____ मिनिटे

  गवत कापण्यासाठी व घरी पोहोचण्यासाठी शेतकऱ्याला एकूण किती वेळ लागला?

  1 तास + 15 मिनिटे = ____ मिनिटे.


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- दैनंदिन जीवनात कामासाठी लागणाऱ्या वेळेची अनेक उदाहरणे घेऊन सहभागींसोबत चर्चा करा.

## माझे शब्द

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- विविध वस्तू मोजण्यास सांगा.
- साधे व डिजिटल घड्याळ यामधील वेळ ओळखण्याचा सराव घ्या.


नवी दिल्ली NEWDELHI
नई दिल्ली
NEW DELHI


मालवा एक्सप्रेस
भेल मसाला
एकता

# 10. प्रवास

**आपण शिकूया!**

- वेळेच्या मापनाचा उपयोग करणे.
  (12 आणि 24 तासांची घड्याळे)
- कॅलेंडर, वेळेची सारणी आणि रेल्वे तिकिटावर दिलेल्या सूचनांबाबत समज तयार करणे.

## खाली दिलेले शब्द वाचा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सीट | दृश्य | ड्रायव्हर | शिटी | पायवाट |
| परतणे | रेल्वे | मार्ग | प्रसाधन | प्रतीक्षालय |
| रस्ता | बैलगाडी | भाडे | सामान | सायकल |
| तिकीट | आगमन | प्रवासी | बस स्टॅण्ड | रेल्वेस्टेशन |
| बुकिंग | रिक्षा | स्लीपर | गार्ड | इंजिन |
| हमाल | प्लॅटफॉर्म | कंडक्टर | आरक्षण | तात्काळ |


**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**


- वरील शब्द प्रवासाशी संबंधित आहेत.
- सहभागींना आपण केलेल्या प्रवासाशी संबंधित जुळलेले मजेदार अनुभव सांगायला लावा.
- प्रवासाशी संबंधित नाटक तयार करण्यास सहभागींना प्रोत्साहित करा आणि इतर साथीदारांना दाखवा.

## गांधीजींच्या आत्मकथेतून

'गिरमिटची प्रथा' या अध्यायात गांधीजी लिहितात –

रेल्वेतील गर्दीच्या त्रासाचा मला खूप वाईट अनुभव आला. मला लाहोरमार्गे कराचीहून कोलकत्याला जायचे होते. लाहोरला गाडी बदलायची होती. तिथल्या रेल्वेचीही परिस्थिती फारच वाईट होती. प्रवासी जबरदस्तीने घुसून आपला मार्ग तयार करायचे. दरवाजा बंद असला, तर खिडकीतून आत घुसून जायचे. मला कोलकत्याला नियोजित तारखेला पोहोचायचे होते. ही रेल्वे सोडून दिली, तर मी कोलकत्याला पोहोचू शकणार नव्हतो. जागा मिळण्याची आशा मी सोडून दिली होती. कोणी मला माझ्या डब्यात येऊ देत नव्हते. शेवटी एक मजूर म्हणाला, ''मला बारा आणे द्या, मी तुम्हांला जागा मिळवून देईन.'' मी म्हणालो, ''आधी मला जागा करून द्या, मग मी नक्की तुम्हांला बारा आणे देतो.'' मजूर प्रवाशांना हातपाय जोडून विनवणी करत होता, पण मला कोणीच आत घ्यायला तयार नव्हते.





गाडी सुटणारच होती, इतक्यात एका डब्यातील काही प्रवासी म्हणाले, ''डब्यात जागा नाही, तरीसुद्‌धा आत घुसू शकत असाल तर प्रयत्न करा, पण उभे राहावे लागेल.'' मजूर माझ्याकडे पाहून म्हणाला, ''काय हो?'' मी ''हो'' म्हणालो आणि त्याने मला लगेच उचलून खिडकीतून आत टाकून दिले. मी आत घुसलो आणि त्या मजुराने 12 आणे मिळविले.

मला ही रात्र फार कठीण गेली. इतर प्रवासी कसे–बसे बसून गेले. मी वरची साखळी पकडून दोन तास उभाच राहिलो. या दरम्यान काही प्रवासी मला धमकावत होते की, ''अरे, तुम्ही बसत का नाही?'' मी खूप समजावले, कुठेच जागा नाही, पण त्यांना माझे उभे राहणे सहन होत नव्हते. ते मला वारंवार त्रास देत होते. ते जितके मला त्रास द्यायचे, तितक्या शांततेने मी त्यांना उत्तर देत होतो. यामुळे ते काहीसे शांत झाले त्यांनी माझे नाव–गाव विचारले. जेव्हा मी माझे नाव सांगितले, तेव्हा ते लाजले. माझी माफी मागितली आणि माझ्यासाठी आपल्याजवळ जागा करून दिली, 'प्रतीक्षेचे फळ गोड असते', या म्हणीची मला आठवण झाली. मी खूप थकून गेलो होतो. माझे डोके गरगरत होते. जेव्हा मला खरोखरच गरज होती तेव्हा ईश्वराने मला बसायला जागा दिली.

## वाचा आणि संवाद करा.

प्रश्न 1. गांधीजी रेल्वे प्रवासासाठी स्टेशनवर पोहोचले. त्यांचा पुढील प्रवास कसा झाला?

प्रश्न 2. गांधीजींच्या काळात रेल्वे, मोटार, टांगा, सायकल आणि बैलगाडी यांसारखी प्रवासाची साधने जास्त दिसत होती. आजच्या काळात प्रवासाची कोणकोणती नवीन साधने दिसत आहेत?

प्रश्न 3. साधारणपणे कोणत्याही प्रवासात पुरुष अधिक दिसतात. स्त्रिया कमी दिसतात. असे का आहे?

प्रश्न 4. ज्याप्रमाणे गांधीजींना आपला प्रवास आठवणीत राहिला, तसेच तुमचा पण एखादा प्रवास आठवणीत राहिला आहे का?

प्रश्न 5. अनेक गावांमध्ये आजही येण्याजाण्यासाठी योग्य सुविधा नाहीत. अशा परिस्थितीत लोकांना कोणकोणता त्रास सहन करावा लागतो, हे तुमच्या भागातील अनुभवांच्या आधारे सांगा.

गांधीजींनी लाहोर ते कोलकात्याची यात्रा 1917 मध्ये केली होती. त्यांना भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या आमंत्रणावर कोलकात्याला जाणे जरुरीचे होते तोपर्यंत त्यांना 'महात्मा' ही पदवी मिळालेली नव्हती; परंतु जेथे ओळखले जात होते तेथे त्यांच्या नावाचा जयघोष नक्की होत होता.

# प्रवास

मी माझ्या बहिणीच्या घरी आलो होतो. दोन–तीन दिवस तेथे थांबणार होतो, मग आपल्या घरी परत जाणार होतो. बहीण पण कधीकधी माझ्याकडे येत असे, पण तिचे येणे आल्यासारखे नसते. आम्ही दोघांनी एकाच घरातून प्रवास सुरू केला होता. बहीण माझ्यापेक्षा तीन वर्षांनी मोठी होती. ती माझे खूप लाड करायची. तिने काहीही खायला घेतले, तरी माझा हिस्सा त्यात असायचा. मी पण कधीकधी तिच्यासोबत माझ्या वस्तू वाटून घ्यायचो. तिला माझे कपडे छोटे व्हायचे. मला तिचे कपडे यायचे पण थोडे ढिले व्हायचे. एकदा मी तिचा फ्रॉक घातला होता, तेव्हा ती पोट धरून हसली. मी समजलो नाही, पण ती हसत होती म्हणून मी पण हसत होतो.



आज सकाळी मी तिच्या घरी आलो आहे. सकाळपासून ती प्रत्येक गोष्टीवर सतत हसत आहे. तिच्या मुलांचे, नवऱ्याचे काम तिच्याशिवाय होत नाही. मला तिला एकटीला भेटायचे होते, परंतु मुले सतत तिच्याभोवती फिरत होती. तिने आमच्या अंगणात पेरूचे झाड लावले होते. यावेळी पहिल्यांदाच त्याला फळे आली आहेत. हे पहिले फळ मी तिच्यासाठी तोडले होते. तेच तिला देण्याची इच्छा होती. मुलांच्या समोर दिले, तर कदाचित मुले हसतील आणि न जाणे ती स्वतः न खाता मुलांना देऊन टाकेल किंवा मुलेच तिच्याकडून हिसकावून घेतील.

आज परत जातो आहे. रात्रीची बस आहे. बसमध्ये सगळे झोपलेले आहेत. ड्रायव्हर तेवढा जागा आहे. तो जागा असलाच पाहिजे, पण मीही जागा आहे. रस्त्यात दुकाने आहेत. थंडीची रात्र आहे. एका दुकानासमोर शेकोटी पेटलेली दिसली. अजून काही दिसले नाही. दोन कुत्री झोपलेली होती. अधूनमधून थोडा प्रकाश दिसून जातो. कुठे दूरवर शेतात एक बल्ब लटकलेला दिसतो. बाकी सगळीकडे अंधार होता. बसच्या हेडलाईटच्या उजेडात थोडा रस्ता दिसत होता.

हा कसला प्रवास! सगळे निवांत झोपले आहेत! सगळ्यांचा ड्रायव्हरवर (चालक) खूप भरवसा आहे. कोणीच जागे नव्हते. सकाळी घरी पोहोचलो.

आई अंगणात बसली होती माझी वाट पाहत! बहिणीने आईसाठी अडकित्ता पाठविला. तो मी बॅगच्या सगळ्यात वरच्या कप्प्यात ठेवला होता. लगेच आईला देऊन टाकला. आई खूप खूश आहे, खूप खूश! मी बॅगेतून तो पेरू काढला आणि झाडाची ती फांदी शोधायला लागलो जिथून मी तोडला होता.

*मूळ स्रोत : सुशील शुक्ल*

## सांगा.

प्रश्न 1. लेखक आपल्या बहिणीला पेरू का देऊ शकला नाही ?

प्रश्न 2. ‘प्रवास’ वाचताना आपणास कसे वाटले ? यातील कोणता भाग तुम्हांला तुमच्या अनुभवाशी साम्य असणारा जाणवला ?

प्रश्न 3. प्रवास करताना लेखकाने बसच्या बाहेर काय-काय पाहिले ?

प्रश्न 4. बऱ्याच वेळी छोटी मुले, आपल्या मोठ्या भावंडांचे कपडे घालतात. तुमचे याविषयी काय मत आहे ?

प्रश्न 5. कथेत असे कोणते उल्लेख आहेत ज्यावरून भाऊ-बहिणीमध्ये खूप प्रेम आहे असे दिसून येते ?

प्रश्न 6. तुम्ही कोणकोणत्या कारणांनी प्रवास केला आहे ?

## वाचा आणि लिहा.

प्रश्न 1. योग्य वाक्प्रचाराचा वापर करून खालील वाक्ये पूर्ण करा.

दर्शन दुर्लभ होणे, पोट धरून हसणे, जीव कासावीस होणे, ढाराढूर झोपणे, डोळा न लागणे.

1) काळजीपोटी रात्रभर माझा ______________________

2) मी फ्रॉक घातलेला पाहून ती ______________________

3) ताईवरच्या कामाचा भार पाहून ______________________

4) रात्रीच्या प्रवासात प्रवासी ______________________

5) आजकाल सज्जनांचे ______________________

प्रश्न 2. योग्य शब्द लिहा.

1) मला ________ वाटली. (खत/खंत)

2) प्रकाश ________ होता. (मद/मंद)

3) ________ कुठे आहेत? (पत/पंत)

4) आरोग्यासाठी ________ खावे. (कंद/कद)

5) रुक्मिणीचा ________ कृष्ण आहे. (कात/कांत)

6) भिंतीचा ________ काळा आहे. (रंग/रग)

प्रश्न 3. तुमच्या गावात किंवा शहरात प्रवासाची कोणकोणती साधने आहेत? खालीलपैकी तुम्ही कोणत्या साधनांचा येण्या-जाण्यासाठी उपयोग करता ते (✓) अशी खूण करून दर्शवा.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) बस | ☐ | 5) स्कूटर | ☐ |
| 2) रेल्वेगाडी | ☐ | 6) ई-रिक्षा | ☐ |
| 3) मेट्रो | ☐ | 7) टॅक्सी | ☐ |
| 4) जीप | ☐ | 8) ट्रक | ☐ |

प्रश्न 4. तुमच्या आठवणीतील प्रवासातील काही अनुभव लिहा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

प्रश्न 5. कोणत्याही प्रवासासाठी कशा प्रकारच्या तयारीची गरज असते? तुमचे विचार सांगा आणि लिहा.

## 24 तासांचे घड्याळ

एका दिवसाचे 24 तास होतात. सामान्यपणे आपण 12 तासांच्या घड्याळात वेळ पाहतो. याचा अर्थ तास काटा पूर्ण दिवसात घड्याळाच्या दोन चकरा पूर्ण करतो. एक चक्कर म्हणजे बारा तास पूर्ण होतात. मग दुसरी चक्कर सुरू होते. या घड्याळात दुपारी 12 वाजण्यापूर्वी A.M. असे लिहितात व त्यानंतरच्या पुढील वेळेसाठी P.M. असे लिहितात. मात्र 24 तासांचे घड्याळ रात्री 12 पासून पुढे पूर्ण 12 तासांचा वेळ दाखविते. जसे : संध्याकाळी 5.00 वाजले तर या घड्याळ 17.00 अशी वेळ दर्शविली जाते. या प्रकारची वेळ दर्शविणारी घड्याळे रेल्वेस्टेशन, विमानतळ इत्यादी ठिकाणी वापरली जातात.

- **वेळ सारणी**

संतोष सेवाग्राम एक्सप्रेसमध्ये बसून मुंबईपासून वर्धा जंक्शनपर्यंत प्रवास करणार आहे. या रेल्वेगाडीच्या वेळेच्या सारणीमध्ये 24 तासांच्या घड्याळाची वेळ दर्शविली आहे.

**12139 सेवाग्राम एक्सप्रेस वेळ – सारणी**

| अ. क्र. | स्टेशनचे नाव | पोहोचण्याची वेळ | स्टेशनवरून सुटण्याची वेळ | अंतर (किलोमीटरमध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई | ______ | 14.55 | ______ |
| 2 | मनमाड जंक्शन | 19.43 | 19.45 | 258 |
| 3 | जळगाव जंक्शन | 21.48 | 21.50 | 418 |
| 4 | वर्धा जंक्शन | 3.52 | 3.55 | 756 |

- आता महाबोधी एक्सप्रेस वेळ-सारणी पाहून सांगा.


1. संतोष, वर्धा जंक्शनला गाडी कधी पोहोचेल? 12 तास दर्शविणाऱ्या घड्याळात तेव्हा किती वाजले असतील?
2. मुंबई ते वर्धा जंक्शन पोहोचण्यासाठी संतोषला किती वेळ लागेल?
3. मुंबई ते वर्धा जंक्शनचे अंतर किती किलोमीटर आहे?
4. मुंबई जंक्शनपासून जळगाव जंक्शन किती दूर आहे?

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना प्रेरित करा, की ते 24 तासांच्या व 12 तासांच्या घड्याळातील वेळ सांगू शकतील, तसेच 24 तासांच्या घड्याळात दिलेली वेळ 12 तासांच्या घड्याळाच्या वेळेप्रमाणे बदलू शकतील.
- रेल्वेच्या वेळापत्रकाचा उपयोग करून सराव करण्याची संधी द्या.

- रेल्वे तिकीट

चला, संतोषच्या रेल्वेगाडीच्या तिकिटाचा नमुना पाहूया!



1) संतोषच्या गाडीचे नाव काय आहे ?

2) गाडीचा नंबर काय आहे ?

3) कोच / बोगी नंबर काय आहे ?

4) सीट क्रमांक काय आहे ?

5) संतोषचे वय किती आहे ?

6) मुंबई ते वर्धा जंक्शनचे तिकीट किती रुपयांचे आहे ?





ही नोट देऊन तिकीट खरेदी केल्यावर किती रुपये परत मिळतील ?




ह्या नोटा देऊन तिकीट खरेदी केल्यावर किती रुपये परत मिळतील ?

■ रेल्वेच्या तिकिटावर दिलेल्या सूचना वाचा, सांगा आणि लिहा.



शुभ यात्रा HAPPY JOURNEY

| पी एन आर नं. PNR NO. | गाडी नं. TRAIN NO. | तिथि DATE | कि.मी. K.M | वयस्क ADULT | बच्चे CHILD | टिकट नं. TICKET NO. A 10698864 |
|---|---|---|---|---|---|---|
| 423-4888961 | 12429 | 30-01-2012 | 705 | 1 | 0 | /10698864 |

श्रेणी CLASS 3वातानु JOURNEY CUM RESERVATION TICKET PRS-SC

बेंगलुरु सिटी जं. सिकंदराबाद जं.

BANGALORE CY JN SECUNDERABAD JN तक आरक्षित / RESV. UP TO 313

| कोच COACH | सीट/बर्थ SEAT/BERTH | लिंग SEX | आयु AGE | यात्रा प्राधिकार T.AUTHORITY | रियायत CONC | आ.शु. R.FEE | श.प्र. S.CH. | सु.प्र. SF.CH | वाउचर रू. VOUCH. Rs. | कु. नकद रू. T.CASH Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B4 | 1 LB | F | 25 | NV | | 20 | | | | 1085 |

Rs.ONE ZERO EIGHT FIVE ONLY

RAJDHANI EXP BRD BANGALORE CY JN SCH DEP 30-01 20:20 ARR 31-01 07:35

313 04-11-2011 16:55 JET 1 VIA DMM

- प्रवासाचे अंतर किती आहे ?
- प्रवासाचा दिनांक काय आहे ?
- या तिकिटाद्वारे कोठून कोठपर्यंत प्रवास करता येऊ शकतो ?
- प्रवासाचे भाडे किती आहे ?
- चार प्रवासी असल्यावर किती भाडे होईल ?
- तिकिटाचा पी. एन. आर. नंबर काय आहे ?

# कॅलेंडर (दिनदर्शिका)

एका वर्षाचे 12 महिने असतात. काही महिने 30 दिवसांचे असतात, तर काही 31 दिवसांचे. फेब्रुवारी हा महिना 28 किंवा 29 दिवसांचा असतो. वर्षाचा पहिला महिना जानेवारी आणि शेवटचा महिना डिसेंबर असतो.

## 2023

### जानेवारी

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

### फेब्रुवारी

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | | | | |

### मार्च

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | |

### एप्रिल

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |
| 30 | | | | | | |

### मे

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 |
| 28 | 29 | 30 | 31 | | | |

### जून

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | 2 | 3 |
| 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | |

### जुलै

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 |
| 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 |
| 30 | 31 | | | | | |

### ऑगस्ट

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 |
| 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 |
| 27 | 28 | 29 | 30 | 31 | | |

### सप्टेंबर

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |

### ऑक्टोबर

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |
| 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 |
| 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 |
| 29 | 30 | 31 | | | | |

### नोव्हेंबर

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 |
| 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 |
| 26 | 27 | 28 | 29 | 30 | | |

### डिसेंबर

| रवि | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 31 | | | | | | |

ज्या वर्षाला 4 ने भागल्यानंतर पूर्ण भाग जातो, त्यावर्षी फेब्रुवारी महिना 29 दिवसांचा असतो. जसे 2016 आणि 2020 मध्ये फेब्रुवारी महिना 29 दिवसांचा होता. 2024 आणि 2028 मध्ये ही फेब्रुवारी महिना 29 दिवसांचा असेल. एका वर्षात 365 दिवस असतात. ज्या वर्षी फेब्रुवारी महिना 29 दिवसांचा असतो त्यावर्षी वर्षाचे दिवस 366 होतात. आपल्या सगळ्यांना माहीत आहे, की एका आठवड्यात सात दिवस असतात. कॅलेंडरमध्ये आठवड्याचा पहिला दिवस रविवार आणि शेवटचा दिवस शनिवार असतो. कॅलेंडरमध्ये एका वर्षात प्रत्येक महिन्याचा हिशोब असतो, जसे महिन्यात किती आठवडे असतील, कोणत्या दिवशी कोणती तारीख असेल, इत्यादी.

**खाली दिलेले कॅलेंडर पाहा आणि समजून घ्या.**

- **खाली वर्ष 2023 च्या मे महिन्याचे कॅलेंडर (दिनदर्शिका) दिलेली आहे, ती पूर्ण करा.**

| रविवार | सोमवार | मंगळवार | बुधवार | गुरुवार | शुक्रवार | शनिवार |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | | | 6 |
| 7 | | | | | | |
| | | | 17 | | | 20 |
| 21 | | | | 25 | | |
| | | | 31 | | | |

## ■ कॅलेंडर पाहून सांगा.

- या महिन्यात किती रविवार आहेत?
- 17 मे ला कोणता वार असेल?
- महिन्याच्या चौथ्या शनिवारी कोणता दिनांक असेल?
- 19 तारखेला सोमवार असेल का?
- जर पियूषने 6 तारखेला प्रवास सुरू केला आणि 15 तारखेला त्याचा प्रवास संपला, तर त्याने किती दिवस प्रवास केला?
- हा महिना कोणत्या दिवशी समाप्त होईल? तुम्ही कसे ओळखाल?
- राणीला शुक्रवारी सुट्टी मिळते. या महिन्यात राणीला 5 सुट्ट्या मिळतील का?

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- सहभागींना प्रेरित करा, की ते कॅलेंडरच्या मदतीने दिलेल्या दोन तारखांमध्ये दिवसांचा हिशोब करू शकतील.

## टिपण

**शिक्षक म्हणून आपण हे नक्की करूया!**

- अध्ययनार्थींनी केलेल्या प्रवासाचे वर्णन करण्यास सांगा.
- प्रवासादरम्यान पाहिलेल्या गावांची तसेच वस्तूंची नावे लिहिण्यास सांगा.

# वर्णमाला

अ आ इ ई उ ऊ ऋ लृ

ए अॅ ऐ ओ ऑ औ अं अः

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

य र ल व श

ष स ह ळ

क्ष ज्ञ

## श्रेय नामावली

- **लेखन व निर्मिती सहभाग :**

  **डॉ. सुचिता राऊत,** अध्यापकाचार्य,
  महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
  **श्रीम. माधुरी देशमुख,** अध्यापकाचार्य,
  महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
  **श्री. शीतल वडनेरकर,** शिक्षिका,
  जि. प. प्राथ. शाळा क्र. २, वेरूळ (कन्या) ता. आर्वी, जि. वर्धा.
  **श्रीम. शुभांगिनी वासनिक,** शिक्षिका,
  जि. प. शाळा, सुलतानपूर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा.
  **श्रीम. दीपा गिरी,** शिक्षिका,
  जि. प. प्राथ. केंद्र शाळा, तळेगाव (टा.), ता. वर्धा, जि. वर्धा.
  **श्रीम. नेहा साळुंखे,** सहा. शिक्षक,
  शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.
  **श्री. सूरज सावळे,** सहा. शिक्षक,
  शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.

